# विटेचा कर्ण



फूटपट्टीचा वापर करून एखाद्या विटेचा – तिच्या एका वरच्या टोकापासून विरुद्ध बाजूच्या खालच्या बाजूच्या खालच्या टोकापर्यंतचा लांब कर्ण कसा काय मोजता येईल?
याचे उत्तर आश्चर्य वाटण्याइतके सोपे आहे.
प्रथम वीट टेबलाच्या कोपऱ्यावर ठेवा. मग तिच्या लांबीइतकीच ती मागे सरकवा. मग A टोकापासून B टोकापर्यंतची लांबी सहजच मोजता येईल.




# चोर पकडा



चोरांना शोधण्यासाठी पोलीस बऱ्याच वेळा त्यांच्या मोबाईल फोनमधून येणाऱ्या संकेतांचा त्रिकोणात्मक पद्धतीने विचार करतात. फोन कंपनी प्रथम त्या फोनमधून येणारे विशिष्ट सिग्नल शोधते. त्यावरून मग त्या फोनच्या सर्वात जवळचे तीन टॉवर कोणते हे ते ठरवतात.

प्रत्येक टॉवरवरून येणारे आणि फोनमधील सिग्नल यांच्यातील ताकदीवरून ते त्या फोनचा ठावठिकाणा निश्चित करू शकतात.

# नकाशे आणि भूमापन

सतराव्या शतकातील फ्रेंच गणितज्ञ रने डेकार्ट यांनी नकाशावरील स्थाने शोधून काढण्यासाठी एका नव्या पद्धतीचा शोध लावला. त्यांच्या या पद्धतीनुसार नकाशावरील कोणतेही स्थान त्याचे उभ्या (Y अक्ष) व आडव्या (X अक्ष) अक्षांतील अंतराच्या संदर्भाने सांगता येते. त्यांना कार्टेशियन कोऑर्डिनेट्स (कार्टेशियन अक्ष) असे नाव देण्यात आले आहे.

